# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी पूर्व, मुंबई-९३

दिनांक : ३०/१२/२०२१

## सूचना पत्र

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील ८६५ रिक्त पदे भरणेकरीता सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (विवयां), लघुलेखक (निम्न श्रेणी), वरिष्ठ लेखापाल, सहाय्यक, लिपीक टंकलेखक, भूमापक, तांत्रिक सहाय्यक (श्रेणी-२), जोडारी (श्रेणी-२), पंपचालक (श्रेणी-२) व वीजतंत्री (श्रेणी-२) या संवर्गातील ५०२ पदे भरणेकामी दि.२०/०८/२०२१ ते दि.२७/०८/२०२१ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आल्या आहेत. सदर परीक्षेची प्रारुप गुणवत्ता यादी दि.१५/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

दि.१३/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ८ (२), ११, १२ व १३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रारुप निवडसूची व प्रारुप प्रतिक्षासूची तयार करण्यात आली असून उमेदवारांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१. प्रारुप निवडसूची व प्रारुप प्रतिक्षासूची उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना दिलेल्या माहितीच्या आधारे गुणानुक्रमे (ऑनलाईन परीक्षेमधील प्राप्त गुणांच्या आधारे) तयार करणेत आली असल्याने सदरहू सूची अंतिम नसून प्रारुप सूची आहे. त्यामुळे केवळ वरील सूचीत समावेश आहे म्हणून ते उमेदवार त्या त्या पदावर हक्क सांगू शकणार नाही.

२. उपरोक्त प्रारुप निवड सूचीतील उमेदवारांना आवश्यक शैक्षणिक / व्यावसायिक कागदपत्रे / प्रमाणपत्रे मूळ प्रमाणपत्रासह पडताळणी / छाननीकरीता उपस्थित राहण्याकरीता स्थळ, दिनांक व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

३. प्रारुप निवड सूचीतील उमेदवार उपलब्ध न झाल्यास किंवा कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीमध्ये अपात्र ठरल्यास सदर संवर्गातील प्रारुप प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणी करीता बोलाविण्यात येईल.

४. सदर प्रारुप निवड सूची व प्रतिक्षा सूची प्रसिध्द झाल्यापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता वैध असेल.

५. उक्त पदांमधील लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदांकरीता स्वतंत्रपणे सूचना पत्र प्रसिध्द करण्यात येत आहे याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION

**प्रशासकीय अधिकारी,**
**मऔविम, मुंबई-९३**